# अग्नी सोलरतर्फे 'मिनी सोलर वॉटर हीटर'

▶ प्रतिनिधी

**पुणे :** पुण्यातील अग्नी सोलर सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड या सौर ऊर्जा उत्पादने निर्मितीमधील अग्रगण्य अशा कंपनीतर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'मिनी सोलर वॉटर हीटर' सादर करण्यात येत आहे.

याविषयी माहिती देताना कंपनीचे संचालक रवी पित्ती यांनी सांगितले, की देशातील अशा प्रकारचा हा पहिला मिनी सोलर वॉटर हीटर असून, छोट्या व मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असे हे उत्पादन आहे.

हा वॉटर हीटर ५०,७५ व १०० लिटर अशा तीन क्षमतेत उपलब्ध करण्यात येत असून, रु. ९,०००/- ते रु. १३,०००/- दरम्यानच्या किमतीत ग्राहकांना मिळेल. सध्या सोलर वॉटर हीटर्स रु. १७ हजारांपासून पुढच्या किमतीत बाजारात उपलब्ध असून, उपयुक्तता व किमतीच्या बाबतीत कंपनीचे हे उत्पादन मोठी बाजारपेठ प्राप्त करेल, असे पित्ती यांनी आवर्जून नमूद केले.

नव्या उत्पादनाचे उद्घाटन, महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी (मेडा)चे डायरेक्टर जनरल जी एम. पिल्ले यांच्या हस्ते आज करण्यात आले. नव्या, छोट्या मॉडेलविषयी माहिती देताना पित्ती म्हणाले, की अग्नी सोलर वॉटर हीटिंग प्रणाली ही आयएसआय दर्जा परिमाणांनुसारच बनविली जाते. नव्या मॉडेलला सौर ऊर्जेबरोबरच पावसाळ्यात वापरता येण्यासाठी इलेक्ट्रिकल बॅक अपची सोयही देण्यात येत आहे.